**PRESS MONITOR**

Publication : Mahasatta
Edition : Kolhapur
Date : March 05, 2017

# रंगीबेरंगी हिंडवेअर स्नोक्रेस्ट एअर कूलर्स बाजारात दाखल



हिंडवेअर या भारतातील सॅनिटरीवेअर बाजारपेठेतील आघाडीच्या ब्रॅण्डचे प्रमोटर एचएसआयएल लिमिटेडतर्फे त्यांच्या एअर कुलर्समधील नव्या उत्पादनांचे अनावरण करण्यात आले. हिंडवेअर स्नोक्रेस्ट या ब्रॅण्डमधील या उत्पादनात एअर कुलर्समधील समोरच्या पॅनलचा रंग बदलता येतो. एअर कुलर्समधील या नव्या उत्पादनांमुळे एचएसआयएलच्या अष्टपैलू आणि व्यापक कन् युमर प्रोडक्ट्स डिव्हिजनला अधिक बळकटी मिळेल. भारतातील ३,६५० कोटींच्या एअर कुलर्सच्या बाजारपेठेत सध्या १० टक्क्यांची घसरण झाली असली तरीही आर्थिक वर्ष १४-१७ या काळात या बाजारपेठेने १६ टक्के सीएजीआर अनुभवला आहे. या बाजारपेठेत संघटित बाजारपेठेचा हिस्सा केवळ एक तृतीयांश आहे. त्यामुळे, एचएसआयएलला त्यांच्या एअर कुलर्समधील उत्पादनांचे अस्तित्व वाढवण्यास साह्य होणार आहे. डेझर्ट, पर्सनल आणि विंडो या विभागातील हे एअर कुलर्स १८ लि. ते १०० लि. अशा एकूण १४ प्रकारांमध्ये उपलब्ध आहेत. रंग बदलता येणाऱ्या पॅनलची सुविधा काही निवडक मॉडेल्समध्ये उपलब्ध आहे. यात सध्या प्रिमिअम पर्पल, ब्रिक रेड आणि आयसी ग्रे हे रंग उपलब्ध आहेत. ३८०० एम/तास या वेगाने हवा बाहेर फेकणाऱ्या या मॉडेलमध्ये कमी ऊर्जा वापरून अद्वितीय थंडावा निर्माण केला जातो. ही ट्रेण्डी रंगीत उत्पादने ८९९० ते १७९९० रु. या किमतीत उपलब्ध आहेत.या शुभारंभाबद्दल एचएसआयएल लि.चे व्हीसीएमडी श्री. संदिप सोमानी म्हणाले, 'अप्रतिम डिझाइन्स, कल्पकता आणि अजोड दर्जा हे एचएसआयएलच्या व्यवसाय नितिमत्तेचे मूळ आहे. कन् युमर बिझनेसमध्ये वाढ करणे आणि या विभागात आघाडीच्या स्थानी पोहोचणे या उद्देशासह आम्ही आमच्या ग्राहकांना उत्कृष्ट उत्पादने यापुढेही देत राहू. कन् युमर प्रोडक्ट्स विभागातील उत्पादनांनी आमच्यासाठी बाजारपेठेत एक स्थान निर्माण केले आणि आम्हाला नव्या संभाव्य ग्राहकांपर्यंत पोहोचण्यात साह्य केले आहे. आमची ही कार्यपद्धती अगदी योग्य मार्गावर आहे आणि त्याचे योग्य परिणाम दिसत आहेत, हे पाहून आम्हाला आनंद होत आहे.